# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक १६/०५/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## घरफोडी करणारे आरोपीतांना केले नागपूर ग्रामीण पोलीसांनी अटक

पोस्टे अप. क्र. ३६४/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भादवि गुन्हयाचे तपासा दरम्यान मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोस्टे रेर्कार्डवरिल सराईत गुन्हेगार नाम आकाश दीलीप सयाम व राहुल उईके दोन्ही रा. मरामाय नगर काटोल हे दोन महीण्यापुर्वी जेलमधुन बाहेर आल्यावर काटोलला घरी आले नाही. परंतु हे दोघे रात्रीला लपुन छपुन काटोलला येतात व सकाळी पहाटे निघुन जातात. नमुद घटना तारखेला दोन्ही आरोपी हे पल्सर मोटर सायकल घेवुन पानठेल्यावर दिसले होते. आणी सध्या आरोपी आकाश सयाम लग्ना कार्यक्रमा करिता काटोलात आलेला आहे. यावरुन आरोपी आकाश सयाम याचा शोध घेतला असता काटोल शहरात मिळुन आला त्याचे ताब्यात असलेली स्प्लेंडर मोटर सायकलबाबत विचारपुस केली असता सदर मोटर सायकल मी व मित्र आरोपी राहुल उईके याचे सोबत मिळुन चोरलेली असल्याचे सांगितले वरुन स्प्लेंलंडर मो सा क्र एम एच ४० एस ४३५७ किंमती २००००/—रुपये जप्त करण्यात आले सदर आरोपी आकाश सयाम यास ताब्यात घेवुन नमुद गुन्हयासंबधाने अधिक विचापुस केली असता नमुद गुन्हयाची कबुली दिली यावरुन आरोपीस अटक करण्यात आली. सदर आरोपीचा कबुली जवाब नोंदविला असता आरोपीने पोस्टे अप. क्र. ३६४/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८० भादवि गुन्हयातील मित्र राहुल उईके याचेसह मिळुन चोरी केली व चोरीत मिळुन आलेले २००००/— रुपये आपसात वाटुन घेतले. आरोपीच्या हिस्यावर आलेले १००००/— रुपये ७२००/— रुपये मोझ मस्ती व दारु पिण्यात खर्च झाले शिल्लक १८००/— रुपये आरोपी कडुन जप्त करण्यात आले आहे व गुन्हयातील उर्वरित रक्कम ही फरार आरोपी राहुल उईके याचेकडे असल्याचे सांगितले. तसेच आरोपी कडुन पो स्टे कोढाळी अप क्र. ३८३/२०२४ कलम ३७९ भा द वि गुन्हयातील पल्सर मोटर सायकल एम एच ४० ए बी ६२५७. किंमती ५००००/— रुपये जप्त करण्यात आली.

तसेच आरोपीने पो स्टे काटोल अप क्र. ३७६/२०२४ कलम ३७९ भा द वि गुन्हयातील मोटर सायकल क्र स्प्लेंडर प्लस मोटर सायकल क्र. MH-40 X 0747 आरोपी राहुल उईके याचे सह चोरी केल्याची कबुली दिली त्याच प्रमाणे पो स्टे कोढाळी अप क्र. ३७७ /२०२४ कलम ३७९ भादवी तुन एन एच पल्सर १२५ सी सी मोटरसायकल राहुल उईके याचेसह चोरी केल्याची कबुली देली.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोस्टे काटोल पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम, सपोनि शिवाजी नागवे, पोउपनि गजानन कंगाले, पोहवा कैलाश उईके, पोना भूषण मदनकर, पोशि गौरव बखाल यांनी केली.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद

## वाहनासह एकुण २५,४०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १६/०५/२०२४ रोजी पोस्टे कन्हान येथील पोलीस स्टाफ पोस्टे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, ट्रक क्र. MH 49 /BJ-8822 मध्ये अवैधरीत्या विनापरवाना रेती (वाळु) ट्रकमध्ये लोड करून वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून नाकाबंदी केली असता ट्रक क्र. MH 49 /BJ-8822 चा चालक **आरोपी नामे— नागेन्द्र देवकी पाहन रा. बालु ता. जि. लातेहार ह. मु स्वामी नारायन मंदीर जवळ खरबी** याला स्टाफने थांबवून पाहणी केली असता वाहनामधील एकुण अंदाजे ०८ ब्रास रेती मिळून आल्याने सदर वाहन चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपीच्या ताब्यातून पांढऱ्या निळया रंगाचा टिप्पर क्र. MH 49 /BJ-8822 किमंत २५०००००/— रू त्यामध्ये अंदाजे ८ ब्रास रेती प्रति ब्रास ५०००/—रू प्रमाणे किमंती ४००००/— रू असा एकुण २५,४०,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करून **चालक आरोपी नामे— १) नागेन्द्र देवकी पाहन रा. बालु ता. जि. लातेहार ह. मु स्वामी नारायन मंदीर जवळ खरबी २) मालक नामे सोहेल खान सरदार खान रा. बडा ताजबाग नागपुर** यांचेविरुद्ध पोस्टे कन्हान येथे कलम ३७९, ३४ भादंवि., सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९६६, अन्वये पो. स्टे. कन्हान येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे कन्हान येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, पोलीस उपनिरीक्षक हारगुडे, पोशि वैभव, चालक अजय यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर